| MHJN050008372025 | **फौज. किरकोळ अर्ज क्र. १११/२०२५**<br>**आतीष अशोक मोर**<br>**वि.**<br>**सरकार तर्फे पोलीस स्टेशन आष्टी** |
|---|---|

# <u>निशाणी क्र.१ वर आदेश</u>

अर्जदार अतिष अशोक मोर यांनी सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता चे कलम ५०३ अन्वये जप्त मुद्देमालातील रोख रक्कम रूपये १८,३००/— परत मिळणेकामी दाखल केलेला आहे.

**२.** तपासी अधिकारी यांनी त्यांच्या खुलाशात सादर केले आहे की, सदर गुन्हा क्र. ११६/२०२५ कलम ३०९(६) सह कलम ३(५) भा. न्या. संहिता २०२३ च्या गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपी क्र. १ निखिल दिलीप जाधव व २. शंकर प्रकाश चव्हाण यांच्याकडुन जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये रक्कम एकूण रूपये १८,३००/— हस्तगत केले आहे. सदरचा जप्त मुद्देमाल अर्जदारास देण्यास तपासी अंमलदार यांनी त्यांची काही एक हरकत नसल्याचा खुलासा सादर केला आहे.

**३.** सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या खुलाशात सादर केले आहे की, सदर गुन्हयाचा तपास अद्याप पुर्ण झालेला नाही. सदरची जप्त रोख रक्कम ही प्रकरण सुनावणीच्या वेळेस अभियोग पक्षास आवश्यक आहे. अर्जदाराचा सदरचा अर्ज मंजूर केल्यास अर्जदार सदरची जप्त रक्कम स्वत:च्या उपयोगासाठी वापरेल, म्हणुन अर्जदाराचा सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. तसेच आरोपी क्र. १ निखिल दिलीप जाधव व २. शंकर प्रकाश चव्हाण यांना त्यांचे म्हणणे देणेकामी नोटिस पाठविली होती. सदरची

नोटिस दोन्ही आरोपींना मिळाली. त्याबाबतचा रिपोर्ट निशाणी क्र. ११ वर आहे. आरोपी हे दि. १३.०५.२०२६ रोजी वकीलांमार्फत न्यायालयात हजर झाले. परंतु त्यांना वेळोवेळी पुरेसा वेळ देवुनही, त्यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. म्हणुन दोन्ही आरोपींविरूद्ध 'विना लेखीजबाब' हा आदेश निशाणी क्र. १ वर पारित करण्यात आला. अर्जाच्या पृष्ठयार्थ अर्जदाराने निशाणी क्र. ३ सोबत एफ.आय.आर. झेरॉक्सप्रत, व नि. १५ वर आधार कार्डची पडताळणी प्रत दाखल केलेली आहे. नि. ०१/१ वर अर्जदाराने स्वत:चे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

४. अर्जदाराने दाखल केलेला अर्ज, कागदपत्रे, गुन्हयासंदर्भातील प्रथम खबर यांचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तूत अर्जासंदर्भात जप्त मुद्देमाल हा अर्जदाराला परत देण्यासंदर्भात आरोपी क्र. १ व २ यांचा खुलासा मागविण्यात आला होता. आरोपी क्र. १ व २ यांना पुरेसावेळ देवुनही त्यांनी त्यांचा खुलासा दाखल केला नाही. अर्जदार यांच्या अर्जातील मागणीप्रमाणे रक्कम रूपये १८,३००/— सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेली आहे. तसेच आजपर्यंत दुसरे कोणीही सदर मुद्देमाल रूपये १८,३००/— मालकीबाबत दावा केलेला नाही. या सर्व बाबींचा विचार करता आरोपी यांच्या ताब्यातुन मुद्देमाल जप्त केला असल्याने अर्जदार हा मुद्देमलाचा तात्पुरता ताबा मिळणेस पात्र आहे.

५. एकूण गुन्हयाच्या तपासाचा विचार केला असता जप्त मुद्देमालाची तपासाकामी यापुढे आवश्यकता नसल्याचे दिसून येते आहे. असे असले तरी खटल्याच्या सुनावणी दरम्यान सदर मुद्देमालाची आवश्यकता पडू शकते. त्यामुळे खालील अटी व शर्तीवर अर्जदारास सदर मुद्देमाल रक्कम रूपये

१८,३००/— देणे योग्य होईल. करीता, खालील आदेश पारित करीत आहे,

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. परतुर पोलिस स्टेशन गुर नं. ११६/२०२५ मधील जप्त मुददेमाल रक्कम रु. १८,३००/— हा अर्जदार अतिष अशोक मोर यांच्या ताब्यात तात्पूरत्या स्वरूपात देण्यात यावा.

अ. अर्जदाराने रोख रक्कम रु. १८,३००/— नियमितरीत्या संरक्षित ठेवावी.

ब. तपासी अधिकारी यांनी रोख रक्कम रु.१८,३००/— अर्जदारास परत करतांना संपूर्ण रक्कमेच्या नोटांचे विवरण नमुद करून सविस्तर पंचनामा करावा.

क. सदर मुद्देमालाचे सर्व बाजुंनी छायाचित्र काढुन त्यावर अर्जदाराच्या स्वाक्ष—या घ्याव्यात.

ड. अर्जदाराने पंचनाम्यासाठी आवश्यक असणा—या छायाचित्रांचा खर्च करावा.

इ. अर्जदाराने खटल्याच्या सुनावणीच्या दरम्यान गरज असल्यास सदरचा मुद्देमाल कोर्टात हजर करावा.

APARNA BALASAHEB RAUT

Digitally signed by APARNA BALASAHEB RAUT
Date: 2026.06.04 15:18:16 +0530

(अपर्णा. बा. राउत)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
कोर्ट नं. २, परतुर

दिनांक ०४.०६.२०२६

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this PDF file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Jr. Clerk | :- | B. N. Kavhale |
| Name of Judge | :- | Judicial Magistrate First Class (Court No. 02), Partur. |
| Date of decision | :- | 04.06.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 043.06.2026 |
| Order uploaded on | :- | 04.06.2026 |

Sd/-
(B. N. Kavhale)
Jr. clerk